# प्रस्तावना

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# वि.आ.तथा तात्यासाहेब कोरे एक ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास

**प्रास्ताविक :-**

प्रत्येक समाजात लोकांच्या आदरास पात्र ठरलेल्या अनेक महनीय व्यक्ती होऊन गेल्या आणि त्यांनी आपापल्या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केली अशी साक्ष इतिहासावरून मिळते. लष्करी नेते, धार्मिक-सामाजिक सुधारक, वैज्ञानिक, राज्यकर्ते, लेखक, कलावंत अशा विविध भूमिका यशस्वीपणे पार पाडून काही व्यक्ती विभूतिमत्वाच्या पातळीवर पोहचलेल्या आपण जगात सर्वत्र पहातो. त्यांच्यापैकी अनेकांचा प्रभाव जनमानसावर त्यांची जीवनयात्रा संपल्यानंतरही दीर्घकाळ टिकून असतो. या सर्वांच्या वर्तनासाठी 'नेतृत्व' अशी संज्ञा सामाजिक शास्त्रात वापरण्यात येते. प्रत्येक क्षेत्रातील व प्रत्येक काळातील नेतृत्वाचे स्वरूप भिन्न असते. पण काही वैशिष्टये मात्र सर्वत्र सारखीच असल्याचे दिसून येते. त्या वैशिष्टयांच्या आधारे आपण नेतृत्वाची संकल्पना मांडू शकतो.

**नेतृत्व म्हणजे काय? :-**

नेतृत्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली आणि तिचे महत्वही आपल्याला स्पष्टपणे जाणवत असले तरी नेतृत्व म्हणजे काय? या प्रश्नाचे सोपे-सुटसुटीत व सर्वसमावेशक उत्तर थोडक्यात देणे मात्र खूपच कठीण जाते. चांगल्या नेत्याच्या अंगी इयॉस, पॅथॉस आणि लॉगॉस असे तीन गुण असणे आवश्यक असते असे अरिस्टॉटल म्हणाला होता. त्या संज्ञांचे मराठी पर्याय पुढीलप्रमाणे देता येतील सामाजिक भावनिष्ठा - इयॉस, कारूण्य - पॅथॉस आणि शब्दशक्ती -लॉगॉस. सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे नैतिक चारित्र्य सूचित होते इतराचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्यातून त्याला मिळते. कारूण्याच्या आधारे नेता लोकाच्या भावनांना हात घालू शकतो

व त्यांना भावनिक प्रेरणा देऊ शकतो. लॉगॉसचा अर्थ जगाच्या उत्पत्तीपूर्वी व उत्पत्तीनंतर जगाविषयी ईश्वराच्या मनात असलेला विचार व्यक्त करणारा शब्द असा होतो. नेत्याच्या संदर्भात शब्दशक्ती (लॉगॉस) म्हणजे स्वतःच्या कृतीचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण - समर्थन करण्याची आणि त्या आधारे लोकांना बौध्दिक कृतींचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण-समर्थन करण्याची आणि त्या आधारे लोकांना बौध्दिक पातळीवर प्रेरित करण्याची नेत्याची क्षमता असा अर्थ घेता येतो.

नेतृत्व व्यक्तिगत असते. व्यक्ती-व्यक्तीमधील जवळीक हा तिचा आधार असतो. त्यांच्या आपापसातील क्रिया-प्रतिक्रिया परस्परांविषयीच्या भावना व अभिवृत्ती नेतृत्वाच्या दृष्टीने महत्वाच्या असतात. नेतृत्व क्रियाशीलतेतून व्यक्त होते. याचा अर्थ असा की नेतृत्व ही गतिशील संकल्पना आहे. अशा पध्दतीने नेतृत्व उदयाला येते. आपल्या देशात लोकशाहीचा पुरस्कार केला असल्यामुळे अनेक प्रकारचे नेतृत्व उदयाला आले आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे महात्मा गांधीजींच्या डोळयासमोर एक स्वप्न होते. नंतर रामराज्य म्हणजेच ग्रामराज्य निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी खेडी सुधारली पाहिजेत. स्वंयपूर्ण झाली पाहिजेत. असे गांधीजी आग्रहाने सांगत होते. या विचाराचा एक परिणाम म्हणून ग्रामीण नेतृत्व पुढे येऊ लागले आणि प्रागतिक विचारांच्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण, मा.वसंतरावदादा पाटील, भाऊसाहेब हिरे, धनंजयराव गाडगीळ, विखे पाटील, धों.के.कर्वे, कर्मवीर भाऊ राव पाटील असे महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात नेतृत्व पुढे आले. तर राजर्षी शाहूंच्या विचारांनी प्रेरीत झालेल्या कोल्हापूर जिल्हयात रत्नाप्पाण्णा कुंभार, माधवराव बागल असे नेतृत्व पुढे आले. या परंपरेतच स्वतःचा आगळावेगळा ठसा उमटविणारे कोल्हापूर व सांगली जिल्हयात पसरलेल्या वारणेच्या खोऱ्यात कर्तत्वाचा डोंगर उभा

करणारे ग्रामीण नेतृत्व म्हणजे मा.विश्वनाथ आण्णा तथा तात्यासाहेब कोरे हे होय.

कोडोली ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे १७ ऑक्टोबर १९१४ रोजी मा. तात्यासाहेब यांचा जन्म झाला. तात्यांचे घराणे हे व्यापारी व सावकारी करणारे होते. त्यामुळेच सुखी व संपन्नही होते. पण तात्यांचा पिंड हा कार्यकर्त्याचा होता. त्यामुळे घरचा उद्योग व व्यवसाय त्यांना आकर्षित करू शकला नाही. त्यामुळेच काळाबरोबर ग्रामीण नेतृत्व म्हणून तात्यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले.

मा. तात्यांच्या कर्ततृत्वाचा आढावा घेत असताना दोन भाग पडता येतील.

१) स्थानिक नेतृत्वाचा कालखंड १९३५ ते १९५२

२) वारणा खोऱ्याचे नेतृत्व १९५२ ते १९९४

## १) स्थानिक नेतृत्व १९३५ ते १९५२ :-

या काळात आपल्या कुटुंबाचा व्यापार-उद्योग, सावकार व शेती हे पहात कोडोलीच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकारण या क्षेत्रांमध्ये त्यांनी भाग घेतला. आपल्या नगराध्यक्ष पदाचा उपयोग ग्रामीण सुधारणेसाठी तर अस्पृश्य निवारणासाठी स्वतःच्या घरी व व्यवसायात अस्पृश्य व्यक्तींना कामावर ठेवले. अस्पृश्य विद्यार्थ्यांना मदत केली. गावात सहभोजन असे अस्पृश्यता निवारणाचे काम केले. त्याचप्रमाणे कर्ज काढून थाटात विवाह करण्यापेक्षा सुधारकी पध्दतीने किंवा गांधी पध्दतीच्या विवाहाचा प्रचार स्वतःच्या कुटुंबातील व मित्रांचे विवाह गांधी पध्दतीने करून समाजात आदर्श निर्माण केला. शिक्षणाशिवाय समतेवर आधारीत नवसमाज निर्माण होणार नाही. हा कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विचार घेऊन १९४६ मध्ये कोडोलीमध्ये वस्तीगृहयुक्त विद्यालयाची स्थापना केली.

सामाजिक कार्य :-

तात्यासाहेबांनी अगदी सुरूवातीपासून सामाजिक कार्याला वाहून घेतलेले होते. समाजात काही सुधारणा करण्याचे काम कोणीतरी करण्यापेक्षा त्याची आपल्यापासून सुरवात झाली पाहिजे या मताचे तात्यासाहेब होते. आपल्यापासून काहीतरी आदर्श समाजाने घेतला पाहिजे. म्हणूनच तात्यांनी आपला बंधू दिनकरचे (नाना) लग्न १९३६ साली सुधारकी पध्दतीने केले. लग्नात मंगलाष्टके म्हटली गेली नाहीत, वधुवरांना नवीन कपडे नव्हते. हुंडयाचा तर प्रश्नच नव्हता, मुहूर्तही पाहिला नाही. अगदी बिनखर्चाने व साधे लग्न केले. ही पध्दत आजच्या काळात फार महत्वाची वाटणार नाही पण ६५ वर्षापूर्वी ही लग्नाची पध्दत म्हणजे क्रांतिकारक घटना होती. अशा पध्दतीने विवाह करणे त्या काळच्या समाजात रूचणारे नव्हते पण हया विवाहाचे नेतृत्व तात्यांनी केले. त्यांच्या भावानेही त्याला साथ दिली. संपूर्ण समाजात वाईट अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी परंपरा हया होत्या पण सर्व गोष्टींना तात्यांनी चांगल्या प्रकारे उत्तरे दिली. त्याचप्रमाणे पुढे आपल्या चुलत बंधूंचेही लग्न अशा पध्दतीने केले. एक प्रश्न असा पडतो की तात्यांनी आपले लग्न मात्र मोठया थाटामाटात केले पण आपल्या भावाचे लग्न मात्र सुधारकी पध्दतीने केले. पण या प्रश्नाचे उत्तर असे मिळते की तात्यांच्यावर क्रांतिसिंह नाना पाटलांचा प्रभाव होता. पण तात्यांनी असे म्हटले होते की नाना पाटलांच्या सहवासात मी उशीरा आलो. त्यामुळे माझे लग्न सुधारकी पध्दतीने केले नाही. पण हया पध्दतीचे महत्व पटल्यावर ती आजूबाजूच्या मित्रमंडळींना पटवून देण्यात कसलीही हयगय तात्यांनी केली नाही.

तात्यांच्या सार्वजनिक जीवनात सर्वात महत्वाची गोष्ट कोणती असेल तर कोडोलीच्या सेवा सोसायटीत त्यांना काम करण्याची मिळालेली संधी होय. साधारण १९३५ च्या सुमारास तात्या एकवीस वर्षाचे असतील तेव्हा कोल्हापूर परिसरातील

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

अत्यंत नामवंत सहकारी संस्था म्हणून कोडोलीची सर्वोदय विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी होय. ''तात्यासाहेबांचे नेतृत्व घडले ते या सेवा सोसायटीत. कारण त्यांच्या तारूण्य अवस्थेतील पंधरा वर्षे या संस्थेमध्ये काम करण्यात गेली. हा काळ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ होय.'' तात्यासाहेब जेव्हा या संस्थेच्या कामात लक्ष घालू लागले तेव्हा ही संस्था 'इ' वर्गातील सहकारी संस्था होती. पण तात्यांनी आपल्या कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण करून ही संस्था अगदी बंद पडण्याच्या मार्गात होती ती बाहेर काढून तिला चांगल्या अवस्थेत आणण्यासाठी फार मोठे काम केले. तात्यांनी जवळपास १५ वर्षे अध्यक्षपद सांभाळले.

काही वेळेला त्यांच्याकडे पद नव्हते तेव्हाही त्यांनी सोसायटीचा जमाखर्च लिहिणे, ठराव लिहिणे, वृत्तांत लिहिणे इ. कामे तात्या आवडीने करत. त्या कामातून तात्यांना एक प्रेरणा मिळाली. आज वारणानगर जे वसले आहे त्याच्या मूळ नेतृत्वाची कल्पना हया सोसायटीत येते. वेळप्रसंगी कटू निर्णय घेणे गरजेचे असते हे हया संस्थेत काम करत असताना कळले. तात्यांच्या एकूण जडणघडणेत ही संस्था फार महत्वाची आहे.

तात्यांच्या आयुष्यात आणखी एक गोष्ट महत्त्वाची किंवा सार्वजनिक कार्यात काम करण्याची मिळालेली संधी म्हणजे कोडोलीचे नगराध्यक्ष पद हे होय. कोडोली हे गाव १९४० च्या सुमारास सात हजार लोकसंख्या असणारे गाव. परंतु कोल्हापूर संस्थानातील काही विशीष्ट नियमानुसार कोडोलीला नगरपालिका-म्युनिसिपालिटी होती. नगरपालिकेच्या कारभारात लक्ष घालावे अशी तात्यांची इच्छा नव्हती. परंतु कोडोली गाव मुळात लहान, संस्थाही मोजक्याच आणि त्यातल्या त्यात सेवा सोसायटीत तात्यांनी केलेले भरीव कार्य यामुळे नगरपालिकेच्या कारभारात सहभाग घ्यावा अशी तात्यांच्या मित्रांची इच्छा होती. अखेर १९४० मध्ये त्यांची कोडोलीच्या

नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. याच्या अगोदर हे पद बिनविरोध कोणालाही मिळाले नव्हते. त्यांच्या कारकिर्दीतील अनेक सामाजिक कार्ये केली ते नगराध्यक्ष असताना दुसरे महायुध्द सुरू होते. अन्नधान्याची कमतरता भासू लागली. त्यांनी कोडोलीत एक स्वस्त धान्याचे दुकान काढले त्यांच्या काळात कोल्हापूरच्या महाराणी ताराबाईसाहेब यांचा सत्कार करण्यात आला.

तात्यांच्या तारूण्य काळात देशात स्वातंत्र्य चळवळीचे वातावरण होते. त्या काळात कोल्हापूर संस्थानात भाई माधवराव बागल, भास्करराव जाधव, रत्नाप्पाण्णा कुंभार, दिनकरराव देसाई, नानासाहेब जगदाळे इ.नेते स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होती. प्रजा परिषदेच्या १४ नोव्हेंबर १९३८ च्या बैठकीत तात्यासाहेबाच्या अनुपस्थितीत परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड केली. सरकार विरोधी शेतकऱ्यांचे प्रचंड मोर्चे निघत होते. तेव्हा तात्यासाहेब त्यात सक्रिय होते. भाषणे देत होते. वास्तविक कोरे घरण्याचा व्यवसाय व्यापार होता. अशा स्थितीत व्यापारी पेशाचा माणूस राजकीय चळवळीपासून दूर राहणारा असतो. कोणत्याही कारणाने सत्ताधिशांना न दुखवणारा पण तात्यांचा खरा पिंड हा कार्यकर्त्याचा होता. नेतृत्वाचा होता. त्यामुळे ते स्वस्थ बसू शकत नव्हते म्हणून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. त्याच्याबरोबर त्याचे काही रामभाऊ घाडगे सारखे मित्रही सहभागी झाले. स्वातंत्र्य चळवळीत काम करत असताना सरकारच्या अन्यायी धोरणाचा त्यांना राग होता. पुढे त्यांनी १९४२ च्या लढयातही सहभाग घेतला. यशवंतराव चव्हाण, डी.के.पाटील यांच्याबरोबर प्रत्यक्ष काम केले. कोरे घरण्याची शेती म्हणजे 'डाग मळा' या मळयात अनेक भूमिगत वावरत असत. या सर्व भूमिगतांना तात्यासाहेब व त्यांच्या कुटुंबियांमार्फत मोठी मदत होत असे. अशा प्रकारे तात्यांनी स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला. शेवटी हया देशातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी हया देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. कित्येक लोक मृत्युमुखी पडले आणि शेवटी १५

ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. देश स्वतंत्र होणार म्हटल्यावर अनेक ठिकाणी सभा, मेळावे घेऊन हा आनंदाचा क्षण साजरा करण्याचे वर्तमानपत्रातून प्रसिध्द होऊ लागले. अनेक नेत्यांनी त्याला प्रेरणा दिली. खेडोपाडी हा आनंद साजरा होणार होता. तात्यांनी हा आनंदाचा क्षण कशा प्रकारे साजरा करावयाचे ते ठरविण्यासाठी कोडोली हया आपल्या गावी बैठक घेतली आणि प्रत्येकाचे मत जाणून घेण्याचे प्रयत्न झाले. शेवटी सर्वांनी तात्यांना सांगितले की "तुमच्या डोळयासमोर एखादा निश्चित कार्यक्रम असल्यास सांगावा ! हया बैठकीत तात्यांनी सांगितले की माझा कार्यक्रम म्हणजे महात्मा गांधीजींनी आखून दिलेला कार्यक्रम" पण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी ताकद लावणे गरजेचे आहे, आणि हा कार्यक्रम म्हणजे सर्व कोडोलीकरांनी त्या दिवशी एकत्र सहभोजन करायचे सर्व जमातींनी एकत्र येऊन तिरंगी झेंडयाच्या साक्षीने मांडीस मांडी लावून एकत्र बसायचे आणि जेवण घ्यावयाचे या गावातील सर्व लोकांना वाढायचं काम हरिजनबंधू करतील. हे आज फार महत्वाचे कार्य वाटत नसले तरी १९४७ साली आपल्या देशात जातीभेद फार मोठया प्रमाणात पाळला जात होता. पण गांधीना समानता प्रस्थापित करावयाची होती म्हणून तात्यांनी आपल्या कुवतीनुसार हे काम पार पाडण्याचा कार्यक्रम आखला आणि तो दिवसही १५ ऑगस्ट १९४७. आपण हया दिवशी एक मोठी क्रांती केली आणि दिडशे वर्षाची जुलमी इंग्रजी सत्ता उलथून टाकली. त्याच दिवशी आपण सर्वांनी एकत्र भोजन करून ही जातीवादाची भिंत उलटून टाकू म्हणून आपल्या छोटयाशा कोडोली गावात सहभोजनाचा कार्यक्रम आखला.

तात्या हे सुधारणावादी होते. सुधारणा हया झाल्या पाहिजेत असे आज बरेच लोक म्हणतात. पण तात्यांनी सुधारणा हया आपल्यापासूनच झाल्या पाहिजेत असा तात्यांचा पिंड होता. आपल्यापासून इतरांनी काही तरी आदर्श घेतला पाहिजे; असे त्यांना सतत वाटत होते. आज नेतृत्व म्हणजे आपल्या हातात कोणतीतरी सत्ता असावी.

राजकारणात सहभाग घ्यावा, त्याच्या द्वारे काहीतरी करावे; असे बऱ्याच नेत्यांना वाटत असते. पण तात्या त्याला अपवाद आहेत. त्यांनी राजकारणात फारसा भाग घेतला नाही; पण आपल्या परिसरात विकासाचे नेतृत्व केले. हे आज वारणानगर पाहिल्यानंतरच कळेल, वारणा परिसर म्हणजे ग्रामीण भाग त्या ग्रामीण भागात तात्यांनी भरीव कार्य केले आहे. असे राजकारणापासून अलिप्त पण विकासाचे नेतृत्व केलेले तात्यासाहेब हे मात्र दुर्मिळच होते.

## २) वारणा खोऱ्याचे नेतृत्व :- १९५२ ते १९९४

भारताची समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था कृषिप्रधान असल्यामुळे कृषि उद्योगधंदयाचा विकास झाला पाहिजे? कृषि उत्पन्नावर प्रक्रिया करणारी कारखानदारी निर्माण झाली पाहिजे? हा विचार स्वातंत्र्योत्तर काळात प्रबळ झाला. याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून डॉ.धनंजयराव गाडगीळ व श्री विखे पाटील यांचे प्रयत्नातून अहमदनगर जिल्हयात प्रवरानगर येथे १९४९ ला पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला. हा सहकारी साखर कारखानदारीचा अभिनव प्रयोग यशस्वी होत आहे हे लक्षात आल्यानंतर १९५२ मध्ये महाराष्ट्रात १२ सहकारी साखर कारखाने उभे करण्याचा महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला. त्यापैकी चार कारखाने कोल्हापूर जिल्हयात उभे करावे असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला.

शासनाचा हा निर्णय म्हणजे तात्यासाहेबांना एक पर्वणी वाटली. तात्यांनी स्वतःला कौटुंबिक जबाबदारीतून मुक्त करून घेऊन पूर्ण वेळ समाजासाठी व साखर कारखान्यासाठी स्वतःला वाहून घेतले. कारखान्याच्या प्रकल्प अहवाल २० ऑगस्ट १९५४ ला मंजूर झाला व ५ जानेवारी १९५५ ला नोंदणी झाली. प्रवर्तक मंडळाच्या पहिल्या सभेतच तात्यासाहेबांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर पाच ते साडेपाच वर्षे तात्यांनी कारखाना स्थळ निश्चिती, भाग भांडवल जमा करणे,

यंत्रसामुग्री मागवणे व कार्यस्थळावर प्रत्यक्ष प्रकल्पाची उभारणी करणे या काळात दाखविलेली योजकता केलेले श्रम, जिद्द आणि चिकाटी याला महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीमध्ये तोड नाही. कारखान्याच्या पाया उभारणीपासून प्रत्यक्ष कारखाना सुरू होईपर्यंत कार्यस्थळावर प्रत्यक्ष झोपडीत राहून कारखाना उभा करणारे तात्यासाहेब एकमेव प्रवर्तक आहेत.

कारखान्याच्या पहिला बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ १६ फेब्रुवारी १९५९ ला झाला. सौ.सावित्रीबाई कोरे (तात्यांच्या पत्नी) यांच्या शुभहस्ते हा समारंभ झाला. आणि १ नोव्हेंबर १९५९ दिपावली पाडव्याच्या मुहूर्तावर तत्कालीन मुंबई राज्याचे लोक प्रिय आणि कर्तबगार मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाण व सौ.वेणुताई चव्हाण यांनी मोठया श्रध्देने कारखान्याच्या मोठया यंत्रसामुग्रीची, ऊस टाकायच्या गव्हाणीची पूजा केली. सुमुहूर्तावर त्यांच्या शुभहस्ते गव्हाणीत ऊस टाकले गेले. आणि तो श्री.वारणा सहकारी साखर कारखान्याचा शुभारंभ होय. तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली फक्त कारखाना उभा राहिला, असे नाही तर आजपर्यंत अनेक वेळा कार्यक्षमतेची राष्ट्रीय पातळीवरची बक्षिसे मिळविली आहेत. त्याचबरोबर ऊस उत्पादकाला प्रथम क्रमांकाचा दर देणारा कारखाना म्हणून नावलौकिक मिळविला आहे.

फक्त कारखाना उभा करणे हे तात्यासाहेब कोरे यांचे उद्दिष्ट नव्हते तर कारखान्याच्या माध्यमातून वारणा खोऱ्याचा व संपूर्ण कार्यक्षेत्राचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कायापालट करून वारणेच्या परिसरात सुसंस्कृत व संपन्न असा 'नवा माणूस' तयार करून आदर्श समाज निर्मितीचे स्वप्न बाळगले. त्यांच्या पूर्तीसाठी साखर कारखान्याच्या पाठिंब्याने व सहकाराच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रकल्प उभे केले आहेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

(१) <u>शैक्षणिक प्रकल्प</u> :-

साखर कारखान्याने समाजाची आर्थिक प्रगती होईल पण आदर्श समाज निर्माण होणार नाही. त्यासाठी समाजाची वैचारिक पातळी उंचावली पाहिजे. म्हणून परिसरातील शेतकरी, कामगार गरीबांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे ही तात्यासाहेब कोरे यांची धारणा होती. परिसरातील लोकांची शिक्षणाची गरज भागविण्यासाठी १९६४ मध्येच मंडळामार्फत श्री वारणा महाविद्यालय सुरू केले. त्यावेळी १२८ विद्यार्थी व १२ प्राध्यापक होते. तर आज २००० विद्यार्थी आहेत व ९५ प्राध्यापक आहेत. १९७३ साली अखिल भारतीय विद्यापीठ कुलगुरूंच्या कोल्हापूर येथील बैठकीच्या प्रसंगी सर्व कुलगुरूंना महाराष्ट्रातील एक उत्तम महाविद्यालय म्हणून वारणा महाविद्यालय दाखविण्यात आले. गेली ३६ वर्षे हे महाविद्यालयाचा शिवाजी विद्यापीठातील एक आदर्श महाविद्यालय म्हणून उल्लेख केला जातो. तसेच १९८३ मध्ये आय.टी.आय. ची सुरवात केली. तसेच ५ सप्टेंबर १९८३ ला 'शिक्षक दिना'च्या पवित्र दिवशी मा.नामदार श्री.वसंतरावदादा पाटील यांच्या पुरोगामी मंत्रिमंडळाने ग्रामीण भागात तंत्रशिक्षणाची असणारी उणीव भरून काढण्यासाठी विनाअनुदान तत्वावर 'तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी' या खाजगी संस्थेला मान्यता दिली. ही संस्था निर्माण करण्यामागची प्रेरणासुध्दा कारखाना क्षेत्रातील सर्व होतकरू तरूणांना तंत्रशिक्षणाची संधी मिळावी हीच होती.

शिक्षणाचा पाया खालून वर जात असतो. पण वारणानगर येथे वरून खाली आला आहे. कारण प्रथम १९६४ मध्ये महाविद्यालय स्थापन झाले नंतर १९६९ साली पूर्व प्राथमिक तसेच १९६९ साली वारणा विद्यालयाची स्थापना केली. सैनिकी शाळा नुकतीच सुरू करण्यात आली असून यावर्षी पाचवी, सहावी व सातवी असे एकूण १४४ एवढी विद्यार्थी संख्या आहे. ही सैनिकी शाळा एक आदर्श सैनिकी प्रशिक्षण देणारी

शाळा आहे.

(२) <u>आर्थिक प्रकल्प</u> :- (बँक)

खेडयात जन्माला येऊन शहरात शाखा उघडण्याचा पराक्रम करणारी राकट भूमीतील प्रागतिक बँक कोणती? असा प्रश्न पडल्यास त्यास 'वारणा सहकारी बँक , वारणानगर' असेच उत्तर द्यावे लागेल. कारण वारणानगर येथे मुख्य कार्यालय असून बँकेच्या शाखा कोल्हापूर, इचलकरंजी, जयसिंगपूर, वडगाव इ.शहरांमध्ये सुरू आहेत. २८ फेब्रुवारी १९६६ ला श्री वारणा सहकारी बँक रजिस्टर झाली. बँकेची घटना 'कृषि औद्योगिक' दृष्टिकोनातून सर्वस्वी तयार करण्यात आली नव्हती. पण पुढे तात्यांनी कृषि औद्योगिक समाज रचनेला हातभार लावणाऱ्या योजना अंमलात आणल्या. आज वारणा बँकेच्या सोळा शाखा असून १४,८२४ सभासद आहेत. बँक वारणा परिसरातील शेती, जोडधंदा, दूध व्यवसाय, टॅक्टर खरेदी, कुक्कुटपालन व्यवसाय इ.करिता कर्जपुरवठा करत असून ग्रामीण कारागिरांनासुध्दा त्यांच्या धंद्याच्या भरभराटीसाठी कर्जपुरवठा करत आहे. तसेच घर बांधणी, वाहतूक व्यवसाय व घरगुती अडचणीसाठी बँकेमार्फत कर्जपुरवठा केला जातो. सुरवातीची दोन वर्षे वगळता बँक सतत 'अ' वर्गात आहे.

(३) <u>दुग्ध प्रकल्प</u> :-

वारणा परिसरातील शेतकरी, शेतमजूर व इतर आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या जनतेचा आर्थिक कायापालट करण्याचे स्वप्न तात्यांनी उराशी बाळगले होते. तात्यांनी वारणा परिसरात अनेक समाज उपयोगी कामे केली. पण त्यात सर्वात यशस्वी ठरलेला प्रकल्प म्हणजे 'वारणा दूध प्रकल्प'. दूध प्रकल्प म्हणजे तात्यांच्या कार्याचा कळस आहे. वारणा खोऱ्यातील सर्व शेतकऱ्यांना विशेषतः जिरायत शेतकऱ्यासाठी शेतीला किफायतशीर जोड धंदा म्हणून २० जुलै १९६८ मध्ये श्री.वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि. या नावाची सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. १९७६ पासून दूधावरील प्रक्रियेस आणि दूध भूकटी आणि तुपाची निर्मिती यांना

सुरवात केली. १९८१-८२ या वर्षी वारणा दूध संघाने तूप, पावडर, श्रीखंड वगैरे दुग्ध पदार्थांची विक्री पुणे, मुंबई येथे खुल्या बाजारात सुरू करून एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल टाकले. वारणा दूध संघाचे कार्यक्षेत्र वारणा सहकारी साखर कारखान्याएवढे म्हणजे पन्हाळा, हातकणंगले, वाळवा, शिराळा या तालुक्यातील मिळून आहे. वारणा सहकारी दुग्ध प्रकल्पाच्या माध्यमातून वारणा परिसरात, जिरायत शेती करणाऱ्या शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्याचे जे भव्य स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले. त्या श्वेतक्रांती बद्दल वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान तर्फे रूपये पंचवीस हजाराचे दुग्ध विकास पारितोषिक आणि मानपत्र मा.तात्यासाहेबांना मिळाले. आज वारणा दूध संघाची सभासद संख्या १५४७४ इतकी आहे. वारणा दूध संघ म्हैशीचे व गाईचे दररोज सरासरी २,२५,००० लिटर्स इतके दूध संकलन करतो. मुंबई, वाशी, पुणे इ. मोठया शहरांमध्ये दुधाची विक्री होते. उर्वरित दुधापासून तूप, श्रीखंड, दूध पावडर, लस्सी इ.उत्पादन केले जाते. वारणा दूध संघाने श्रीखंडाचे उत्पादन व विक्रीमध्ये उच्चांक प्रस्थापित केला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी असणाऱ्या चीज उत्पादनासाठी परदेशातून आवश्यक ती मशिनरी आणली आहे. आज वारणेचे श्रीखंड संपूर्ण देशभर चवीने खाल्ले जाते. वारणा खोऱ्यातील शेतकऱ्यांनी मोठया जिद्दीने दूध उत्पादन करून संघाचे नांव वाढवले आहे.

<u>वारणेच्या इतर काही संस्था</u> :-

<u>वारणा बझार</u> :-

वारणा म्हणजे विकास हे जसे समीकरण आहे त्याप्रमाणे वारणा बझार म्हणजे प्रत्यही नवनवे विक्रम. असेही समीकरण जुळले आहे. वारणा बझार हे आपल्या देशातील ग्रामीण भागातले पहिले सहकारी सकल वस्तु भांडार असून त्याची स्थापना २ एप्रिल १९७८ ला झाली. वारणा बझार ही अत्यंत विश्वासू ग्राहक संस्था आहे. वारणा बझारने एकूण ४१.५० कोटी रूपयांची विक्री केलेली आहे. २४ वर्षाच्या कारकीर्दीमध्ये

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

वारणा बझारने वारणानगर व पेठवडगांव या दोन ठिकाणी डिपार्टमेंटल स्टोअर्स व ३१ शाखा स्थापन केल्या आहेत. वारणा बझारचे एकूण सभासद ९७७६ आहेत त्यामध्ये स्त्री सभासद संख्या ७५५१ इतकी आहे व पुरूष सभासद २२२५ इतके आहेत. स्त्री सभासदांचे प्रमाण ७७% इतके आहे. ही एक अतिशय उल्लेखनीय बाब आहे. वारणा बझारच्या धर्तीवर अनेक ठिकाणी असे बझार सुरू झाले त्यामध्ये रायगड बझार, श्रीराम बझार फलटण, वसंत बझार सांगली, जनता बझार कराड इ.

<u>वारणा कोंबडी सहकारी संघ</u> :-

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकरीवर्गाला एखादा किफायतशीर जोड व्यवसाय असावा म्हणून तात्यांनी २७ डिसेंबर १९६३ ला श्री वारणा कोंबडी सहकारी संघाची स्थापना केली. याशिवाय साखर कारखान्याचे काही सभासद आणि कर्मचारी यांनी एकत्र येऊन सहयाद्री कुक्कुट पालन संस्था १८ जुलै १९६८ ला स्थापन केली. कुक्कुट पालन हा व्यवसाय बेभरवशाचा आहे. कारण महाराष्ट्रात अन्यत्र कोंबडीपालन व्यवसाय सत्तर ते ऐंशी टक्के अयशस्वी होताना दिसतो. याला प्रमुख कारण म्हणजे नियोजनाचा अभाव. पण वारणा कोंबडी सहकारी संघाचे वैशिष्टय असे की त्याने या व्यवसायात निश्चित यश मिळवून दाखविले आहे. याचे कारण म्हणजे तात्यासाहेबांचे कुशल नेतृत्व होय. कोल्हापूर आणि सांगली जिल्हा कार्यक्षेत्र असलेले पोल्ट्री संस्था म्हणजे श्री.वारणा कोंबडी सहकारी संघ होय. पोल्ट्री व्यवसाय शेतकऱ्यांना विशेषतः जिरायत शेतकऱ्यांना हा व्यवसाय महत्वाचा आहे. वारणेमध्ये हे दोन पोल्ट्री संघ यशस्वी होत आहेत हे लक्षात येताच १९८८ मध्ये तात्यांनी विश्वनाथ कुक्कुट पालन सहकारी संस्था हा आणखी एक पोल्ट्री संघ स्थापन केला. आज वरील तिन्ही संस्था अत्यंत चांगल्या चालल्या आहेत आणि त्याद्वारे वारणा परिसरातील शेतकऱ्यांना कुक्कुटपालन व्यवसायाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण या संस्थेमार्फत दिले जाते.

**श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ :-**

श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्याच्या सक्रीय सहकार्यातून आणि अनुदानातून सन १९७९ पासून कार्यरत असणारे श्री.वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ ही एक सेवाभावी संस्था आहे. या संस्थेमार्फत कारखाना कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागात प्रत्येक खेडयापाडयात आणि वाडी वस्तीवर जिथे गरज आहे त्या-त्या ठिकाणी बाल शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच ग्रंथ हा मानवाचा मित्र हे तत्व वापरून तात्यासाहेब कोरे आदर्श ग्रंथालय व आदर्श ग्रंथपाल पुरस्कार योजना राबविली जात असते. प्रतिवर्षी प्रथम येणाऱ्या ग्रंथालयाला व ग्रंथपालाला रोख रक्कम व प्रशस्तीपत्र दिले जाते. तसेच ती संख्या समाज उपयोगी व्याख्यानमाला आयोजित करून समाजाला जागृत करण्याचे काम करत असते.

श्री वारणा ॲग्रीकल्चर गुडस् प्रोसेसिंग को-ऑप सोसायटी, कै.तात्यासाहेब व कै.विलासदादा यांनी वारणा परिसरातील शेतकऱ्यांना फळबागाची शेती करणेसाठी व त्यातून आपली प्रगती साधणेसाठी विविध फलांक प्रक्रिया करून त्यापासूनची उत्पादने परदेशात निर्यात करणेसाठी वारणा ॲग्रीकल्चर गुडस् प्रोसेसिंग को-ऑप सोसायटीची स्थापना २३-१०-१९९८ रोजी वारणासमुहाचे नेते विजय कोरे (सावकर) यांनी सुरू करून तात्यांना अभिप्रेत असलेले शेतकऱ्यांच्या विकासाचे स्वप्न साकार करून दाखविले आहे.

याशिवाय अनेक कामे करून तात्यांनी ग्रामीण विकास केला आहे. आज वारणा परिसर पाहिला की, असे वाटते की तात्यांनी आपल्या कर्तृत्वाने वारणेचे नंदनवन केले आहे. तात्यांच्या विचारात कल्पकला होती, दूरदृष्टी होती आणि आपल्या खंबीर नेतृत्वाने कोल्हापूर-सांगली जिल्हयातच नव्हे तर पूर्ण देशात त्यांनी एक क्रांती केली आहे. तात्या ही कामे करताना राजकारणापासून शक्यतो अलिप्त राहिले आहेत.

अनेक वेळा निवडणुकीसाठी त्यांनी उभे राहावे यासाठी त्यांचे मित्र यशवंतराव चव्हाण यांनी प्रयत्न केला. पण तात्यांनी राजकारणापासून अलिप्त राहून सहकारी चळवळीत काम करून ग्रामीण भागाचा विकास करण्याचे ठरविले. आज जी लोकांची कल्पना आहे की विकास करण्यासाठी आपण आमदार, खासदार, मंत्री असणे आवश्यक आहे पण तात्यांनी आपल्या कर्तृत्वाने व नेतृत्वाने संपूर्ण वारणा परिसराचा विकास करून एक आदर्श निर्माण केला आहे. वरील सर्व कार्यावरून आपणास दिसून येते की तात्यांनी ग्रामीण नेतृत्व करून विकास केला आहे.

<u>प्रबंधाविषयी थोडक्यात माहिती</u> :-

आपला देश हा कृषि प्रधान देश आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. तसेच आपल्या देशातील बहुसंख्य लोक हे ग्रामीण क्षेत्रात राहतात. देश सुधारावयाचा असेल तर शेती आणि खेडयाचा विकास झाला पाहिजे. तसेच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय दृष्टया जनता जागृत होणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टी घडावयाच्या असतील तर विधायक दृष्टी असणारा ग्रामीण नेता असणे आवश्यक आहे. तरच एखाद्या ठराविक भागाचा विकास होण्यास मदत होईल. पण आपला देश विस्ताराने मोठा असल्यामुळे असे अनेक नेते निर्माण होणे गरजेचे आहे. किमान शंभर खेडयात एक नेता निर्माण होणे गरजेचे आहे, तर देश सुधारेल, जगात नाव कमवेल.

या सर्व गोष्टींना पात्र ठरणारे ग्रामीण नेतृत्व म्हणून तात्यासाहेब कोरे यांचा उल्लेख होऊ शकतो. आज नेता आणि राजकारण, निवडणुका यांचा अगदी जवळचा संबंध आहे. पण नेतृत्व हे निवडणुकांपुरतेच मर्यादित न राहता आपल्या अंगभूत गुणांमधून आपल्या भागाचा, परिसराचा विकास महत्त्वाचा आहे. तात्यासाहेब कोरे यांनी अनेक अडचणींना तोंड देऊन प्रथम कारखाना, शिक्षण संस्था, कोंबडी पालन, बँक, दूध संघ, बझार असे अनेक उद्योग-व्यवसाय उभे करून ग्रामीण भागाचा कायापालट केला

आहे. अशा या ग्रामीण नेत्याच्या कार्याची ओळख व्हावी हा उद्देश समोर ठेऊन त्यांचा अभ्यास संशोधनात्मक पध्दतीने केला आहे. त्यांचा आदर्श संपूर्ण समाजाला व्हावा, वारणा परिसरात ज्या पध्दतीने कृषि औद्योगीक प्रगती झाली, त्याची सत्य माहिती समाजापुढे येण्यासाठी वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे-ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास हा शोध-प्रबंध लिहण्याचा प्रयत्न केला आहे.

तात्यांच्या कार्याविषयी षष्ठयब्दिपूर्ती समारंभ समिती, अमृतमहोत्सव समिती, गौरव अंक एवढया पुरतेच लिखाण झाले आहे. तात्यांच्या कार्याविषयी संशोधनात्मक पध्दतीने लिखाण कोठेही झालेले नाही. म्हणून ऐतिहासिक, सामाजिक व्यक्ती चरित्रात्मक अभ्यास पध्दतीचा वापर करून लिखाण केले आहे.

याचा फायदा २१ व्या शतकात भेडसावणाने प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित मदत होईल. तात्यांच्या नेतृत्वाखाली वारणा विविध उद्योग व शिक्षण समूह ज्या पध्दतीने उभे राहिले त्यांचा आदर्श घेऊन इतरत्र असे कार्य करण्यास चालना मिळू शकते. भारत देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी तात्यांच्या सारखे नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे. त्यांच्या विधायक नेतृत्वामुळे वारणा खोऱ्यातील ग्रामीण जनता सुखी-समाधानी झाली आहे.